**सुट्टीची सूचना**

१ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या निमित्ताने दैनिक वादळ वार्ता कार्यालयाला सुट्टी असणार आहे. यामुळे दि.२ मेचा अंक प्रकाशित होणार नाही याची वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी. – व्यवस्थापक

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता






vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.१ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 1 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 242 | Pages 4 | Rate 4 Rs


# १२ वीच्या विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपली!
# २ तारखेला होणार निकाल जाहीर

### कुठे पाहायचा निकाल?

महाराष्ट्र बोर्डाचा इयत्ता १२वीचा निकाल आता पूर्णपणे तयार असून विद्यार्थ्यांनी ताज्या अपडेट्ससाठी दररोज अधिकृत संकेतस्थळांना भेट देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना आपला निकाल 'mahahsscboard.in' या अधिकृत वेबसाइटवर पाहता येईल. त्यासाठी वेबसाइटवरील एचएससी परीक्षा निकाल २०२६ या लिंकवर क्लिक करून आपला आसन क्रमांक आणि आईचे नाव अचूकपणे प्रविष्ट करावे लागेल. या सोप्या पायऱ्यांचे अनुसरण करून निकाल पहा या पर्यायावर क्लिक करताच विद्यार्थ्यांना त्यांचा स्कोअरकार्ड सहजपणे ऑनलाइन तपासता येईल.

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा १२वीचा निकाल २ मे २०२६ रोजी जाहीर होणार असून, गेल्या अनेक दिवसांपासून निकालाची प्रतीक्षा करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांची ही उत्सुकता आता संपणार आहे. बोर्डाच्या परंपरेनुसार, निकालाच्या एक दिवस आधी अधिकृत सूचना जारी केली जाते आणि त्यानुसार २ मे रोजी सकाळी ११ वाजता मंडळाची पत्रकार परिषद पार पडणार आहे. या परिषदेत निकालाची अधिकृत घोषणा झाल्यानंतर, दुपारी १ वाजता बोर्डाच्या वेबसाइटवर निकालाची लिंक सक्रिय केली जाईल, जिथून विद्यार्थ्यांना आपला निकाल ऑनलाइन पाहता येईल.



### कसा पाहायचा निकाल?

इयत्ता १२वीचा निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी mahahsscboard.in, mahresult.nic.in आणि hscresult.mkcl.org या अधिकृत संकेतस्थळांचा वापर करावा. निकाल जाहीर होताच लाखो विद्यार्थी एकाच वेळी लॉगिन करत असल्याने वेबसाईट मंदावण्याची शक्यता असते. अशा वेळी ब्राउझरचा कॅशे साफ करणे, एकाच वेळी विविध टॅबमध्ये वेगवेगळ्या वेबसाईट उघडून ठेवणे किंवा काही वेळाने पुन्हा प्रयत्न करणे सोयीचे ठरेल. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी भविष्यातील संदर्भासाठी आपली गुणपत्रिका डाऊनलोड करून घ्यावी किंवा तिची प्रिंट काढून सुरक्षित ठेवावी.


## महाराष्ट्रात आधुनिक विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्वपूर्ण निर्णय-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. या संदर्भात १३ जुलै २०१७ रोजी तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून केंद्र शासनाच्या आरोग्य संशोधन विभागामार्फत देशभर उभारण्यात येणाऱ्या १५० अत्याधुनिक विषाणू प्रयोगशाळांच्या उपक्रमाचे स्वागत करत महाराष्ट्राला योग्य वाटा देण्याची मागणी करण्यात आली होती. या पत्रात देशाच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूर आणि राज्याची राजधानी मुंबई येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा तसेच राज्यातील विविध विभागांतील दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती.

केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे राज्यस्तरीय विषाणू प्रयोगशाळा मंजूर केली. याशिवाय इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच अकोला, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे आणि मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उभारण्यास मान्यता देण्यात आली.

या योजनेसाठी केंद्र शासनाकडून एकूण २९ कोटी २१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून



अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करून प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या. कोविड-१९ महामारीच्या काळात या प्रयोगशाळांनी आरटी-पीसीआर चाचण्यांद्वारे मोठी भूमिका बजावली.

याशिवाय, या प्रयोगशाळांमुळे विविध विषाणूजन्य आजारांचे निदान करणे शक्य झाले आहे. आतापर्यंत कोविड-१९ (३७,२१,१५४), डेंग्यू (८८,३२७), चिकनगुनिया (३९,८१७), झीका (३,९२३), स्क्रब टायफस (७,०९१), इन्फ्लुएंझा (२७,५३६), एचबीव्ही (१,५३,१८०), रोटाव्हायरस (६५१) अशा एकूण ४०,४१,६८९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळाली असून भविष्यात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारांशी लढण्यासाठी राज्य अधिक सक्षम झाले आहे.

## दादासाहेब ससाणे यांनी कार्य अहवाल पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांना केला सादर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख श्री.एकनाथरावजी शिंदे उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा मुख्यनेते शिवसेना यांना विधानसभा प्रमुख केज दादासाहेब ससाणे यांनी आजपर्यंत शिवसेना पक्षात केलेल्या पक्ष कार्याचा कार्य अहवाल सादर केला.यावेळी शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळक, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्नील भैया गलधर,डॉ. सौ.प्रतिभाताई अशोक थोरात,शिवसेना महिला बीड जिल्हा संपर्कप्रमुख संगीताताई चव्हाण,युवा सेना तालुका प्रमुख दत्तकुमार काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



## विद्यार्थ्यांसाठी दिलासा एमपीएससी फॉर्म भरण्यास मुदतवाढ खा.बजरंग सोनवणे यांच्या मागणीला यश

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय जाहीर झाला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ साठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख १४ मे २०२६ पर्यंत वाढवली आहे.या महत्त्वपूर्ण निर्णयामागे बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केलेल्यासातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाल्याचे मानले जात आहे.

**विद्यार्थ्यांच्या अडचणींना मिळाला न्याय**

राज्यातील अनेक विद्यार्थ्यांना नान क्रिमिलेअर,ईडब्ल्युएस प्रमाणपत्र,उत्पन्न दाखला यांसारखी आवश्यक कागदपत्रे वेळेत मिळत नव्हती.महसूल विभागा तील विलंबामुळे हजारो पात्र उमेदवार अर्ज प्रक्रियेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती.

ही बाब लक्षात घेऊन खासदार बजरंग सोनवणे यांनी एमपीएससी प्रशासनाकडे मुदत वाढीची मागणी केली होती.विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून आयोगाने सकारात्मक निर्णय घेतला.

**नवीन मुदतीचा तपशील**

अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.१४ मे २०२६ (रात्री ११-५९ पर्यंत),ऑनलाईन शुल्क भरणा दि. १४ मे २०२६

चलनाद्वारे शुल्क भरण्याची अंतिम तारीख दि.१८ मे २०२६

**विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी**

या मुदतवाढीमुळे अजून अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना मोठी संधी मिळाली आहे.आवश्यक



कागदपत्रे पूर्ण करून आता ते निर्धास्तपणे अर्ज करू शकतात.

**खासदार सोनवणे यांची भूमिका**

खासदार बजरंग सोनवणे यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन शासन व आयोगाकडे ठामपणे पाठपुरावाकेला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

विद्यार्थ्यांनो,ही संधी गमावू नका वेळेत अर्ज पूर्ण करा आणि आपल्या स्वप्नांच्या दिशेने एक पाऊल पुढे टाका असे आवाहन खासदार बजरंग सोनवणे यांनी केले आहे.

## बसवेश्वर पुतळा सुशोभीकरणासाठी ७ मे रोजी मोर्चा; बहुजनांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन



दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

समतेचे पुरस्कर्ते महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाच्या मागणीसाठी दि. ७ मे २०२६ रोजी लोहा नगर परिषदवर शिवा संघटनेच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार असून, या मोर्चात सर्व बहुजन समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी केले.

लोहा येथे बसवेश्वर महाराजांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी शहरातील बसवेश्वर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर समाजोपयोगी उपक्रमांतर्गत थंड पाण्याचे पॉइंट व खिचडी वाटप स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले.

सायंकाळी ढोल-ताशांच्या गजरात बसवेश्वर महाराजांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. विविध गीते व फटाक्यांच्या आतषबाजीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकीचा समारोप व्यंकटेश गार्डन येथे होऊन त्याचे रूपांतर सभेत झाले.

समारोप सभेत प्रा. धोंडे यांनी पुतळ्याचे सुशोभीकरण तातडीने करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला. त्यांनी संविधानाने दिलेल्या अधिकारांचा उल्लेख करत सर्व जाती-धर्मातील नागरिकांनी एकत्र येऊन या मागणीसाठी लढा देण्याचे आवाहन केले. तसेच, लोह्यात १६ वर्षांनंतर शिवा संघटनेचा मोर्चा निघणार असल्याने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.

## ईगलवूड इंग्लिश स्कूलचा दुहेरी मानाचा तुरा : नवोदय परीक्षेतही जिल्ह्यात प्रथम

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

ईगलवूड इंग्लिश स्कूलने यंदाच्या शैक्षणिक वर्षात यशाची परंपरा अधिकच उजळवत दुहेरी मानाचा तुरा आपल्या शिरपेचात रोवला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या उइडए दहावीच्या निकालात विद्यार्थिनी वाघ जान्हवी विठ्ठल हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत शाळेचा नावलौकिक उंचावला होता. या अभिमानास्पद कामगिरीनंतर आता पुन्हा एकदा शाळेने यशाची नवी उंची गाठली आहे. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत इयत्ता नववीतील विद्यार्थी परदेशी भावेश लक्ष्मीनारायण याने उत्तुंग यश संपादन करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याच्या या भव्य यशामुळे ईगलवूड शाळेच्या गौरवशाली परंपरेत आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे.



भावेशच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार, सचिव डॉ. शरद पवार, विश्वस्त डॉ. सुशील भैय्या लोढा तसेच प्राचार्य सत्यजित सर यांनी त्याचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांच्या मते, विद्यार्थ्यांची चिकाटी, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच अशी उज्ज्वल यशोगाथा घडते.

या यशामुळे शाळेच्या सर्व शिक्षकांमध्ये आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांमध्येही शाळेबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध वातावरण आणि सर्वांगीण विकास यांमुळे ईगलवूड इंग्लिश स्कूल हीच पालकांची पहिली पसंती बनत आहे.ईगलवूड इंग्लिश स्कूलची ही यशस्वी घोडदौड भविष्यातही अशीच सुरू राहो, अशीच सर्वांकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय

## नावीन्यपूर्णतेच्या युगाचा करा स्वीकार

गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, मेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारीकपातीच्या बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. या परिवर्तनात अनेक नव्या संधी दडल्या आहेत.

आजच्या काळात जग झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञान, शिक्षण, करिअरच्या संधी आणि जीवनशैली या सर्व गोष्टींमध्ये मोठे परिवर्तन होत आहे. जग अशा एका टप्प्यावर उभे आहे, जिथे तंत्रज्ञान अभूतपूर्व वेगाने बदलत आहे. जागतिक माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा चेहरा-मोहरा पूर्णपणे बदलून गेला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, मेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारी कपातीच्या (ले-ऑफ) बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. एखादी मोठी कंपनी कर्मचारी कपात करते, तेव्हा सामान्यतः मंदीची भीती व्यक्त केली जाते. पण सध्याचे ले-ऑफ हे मंदीपेक्षा 'बदलत्या प्राधान्यक्रमामुळे' अधिक आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑटोमेशन (स्वयंचलन) आणि क्लाउड कॉम्प्युटग यांसारख्या तंत्रज्ञानांमुळे कामाचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी दहा लोकांची गरज असणारी कामे आता प्रगत सॉफ्टवेअरच्या मदतीने कमी वेळेत आणि अचूकपणे होऊ लागली आहेत. याचा अर्थ असा की, पारंपरिक कौशल्ये असलेल्या कर्मचाऱ्यांची गरज कमी होत असून नवीन तंत्रज्ञान अवगत असलेल्या लोकांची मागणी वाढत आहे.भारतीय आयटी क्षेत्र हे जगाचे पॉवरहाऊस म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रात अनुभवायला मिळत असलेल्या ताज्या बदलांमुळे भारतीय आयटी उद्योग आकुंचन पावेल, अशी अनेकांना भीती वाटते; परंतु वास्तव याच्या उलट आहे. भारतीय आयटी क्षेत्र कमी होत नसून संक्रमित होत आहे. सायबर सिक्युरिटी, डेटा नालिटिक्स, मशीन लर्निंग आणि रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. या क्षेत्रांसाठी केवळ पदवी पुरेशी नसून विशिष्ट कौशल्ये, विश्लेषणात्मक विचार आणि सतत शिकण्याची तयारी असणे आवश्यक आहे. स्वतःला या बदलांनुसार जुळवून घेणाऱ्या व्यावसायिकांसाठी भविष्यात संधींचे आकाश खुले आहे. त्यानुसार त्यांना परिस्थितीची जाणीव व्हायला हवी. भारतातील पुणे, बंगळूरु आणि हैदराबादसारखी शहरे आता जागतिक स्तरावर 'इनोव्हेशन हब' म्हणून नावारूपाला येत आहेत. विशेषतः पुण्यात 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स' (जीसीसी) मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पूर्वी ही केंद्रे केवळ बॅक-ऑफिस कामांसाठी वापरली जात होती, पण आता ती जागतिक कंपन्यांची धोरणात्मक संशोधन आणि विकास केंद्रे बनली आहेत. याचा अर्थ असा की, भारतीय प्रतिभा आता मायदेशात राहूनच जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञानावर काम करत आहेत. ही केंद्रे केवळ सेवा देणारी नसून जागतिक स्तरावर नावीन्यपूर्ण शोध लावणारी केंद्रे बनली आहेत.या बदलाच्या काळात आयटी विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी असलेला एक महत्त्वाचा संदेश म्हणजे अनुकूलता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. पूर्वी एकदा पदवी घेतली की, आयुष्यभर त्या जोरावर नोकरी करता येत असे, पण आता ती परिस्थिती राहिलेली नाही. तंत्रज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, दर दोन-तीन वर्षांनी तुम्हाला नवीन काही तरी शिकावेच लागेल. सतत शिकणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि तांत्रिक प्रगतीशी अपडेट राहणे, हे आता करिअरमधील यशाचे मूलभूत मंत्र बनले आहेत. ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म्स, इंडस्ट्री सर्टिफिकेशन आणि प्रत्यक्ष प्रकल्पांवरील कामाचा अनुभव आता नोकरीच्या बाजारपेठेत तुमची किंमत ठरवत आहेत. ती ओळखून आपल्या कौशल्यांमध्ये बदल करत राहणे गरजेचे आहे, हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या नव्या पिढीला कळणे आवश्यक आहे. यापुढील काळात फक्त विद्यार्थ्यांनीच बदलून चालणार नाही, तर आपल्या शैक्षणिक संस्थांनाही काळानुसार बदलावे लागेल. उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ आणि धोरणकर्ते यांनी एकत्र येऊन 'कौशल्य दरी' भरून काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करणारे अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. कल्पकता वाढवणे, उद्योजकता जोपासणे आणि डिजिटल साक्षरतेमध्ये गुंतवणूक करणे यामुळेच भारताची जागतिक स्पर्धात्मकता टिकून राहील.प्रत्येक क्षेत्रात वेगाने वाढत असलेली कृत्रिम बुद्धिमत्ता नोकऱ्या हिरावून घेईल, अशी भीती अनेकांना वाटते. पण इतिहास साक्षी आहे की, जेव्हा जेव्हा नवीन तंत्रज्ञान आले, तेव्हा सुरुवातीला काही नोकऱ्या गेल्या; पण त्यापेक्षा कैक पटींनी नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. संगणक आले तेव्हाही अशीच भीती होती, पण संगणकामुळे आज आयटी क्षेत्रात लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे. एआय हे मानवाचे रिप्लेसमेंट नसून मानवाची क्षमता वाढवणारे एक साधन आहे. एआयचा प्रभावी वापर करायला शिकतील तेच भविष्यातील कामाच्या ठिकाणी सर्वात मौल्यवान असतील. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व आणखी वाढणार, हे निश्चित आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. नवी संशोधन केंद्रे, नवउद्योग आणि शैक्षणिक संस्था या विषयावर भर देत आहेत. त्यांना अपेक्षित मनुष्यबळ आणि अस्तित्वात असणाऱ्या कार्यपद्धतीतील बदल लक्षात घेऊन आपल्या कामात बदल करणारे काळाची कसोटी पार करतील, तसेच बदलणाऱ्या अपेक्षांची पूर्तताही करतील. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.नव्या युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जिज्ञासू वृत्ती. नेहमी प्रश्न विचारा आणि नवीन गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक राहा. या युगात तांत्रिक कौशल्ये आवश्यक आहेतच, पण त्याचबरोबर 'सॉफ्ट स्किल्स' ही तेवढीच महत्त्वाची आहेत. संवादकौशल्य, नेतृत्व आणि सांघिक कार्य या बाबी मशीन करू शकत नाहीत. त्यामुळे या कौशल्यांचे महत्त्व कधीच कमी होणार नाही. नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करताना प्रत्येकाने बदलांचा धैर्याने स्वीकार करायला हवा. ले-ऑफ किंवा बदलांना न घाबरता संधी म्हणून पाहायला हवे.थोडक्यात सांगायचे तर, आयटी क्षेत्राचा हा काळ नवनिर्माणाचा आहे. जुन्या पद्धती नष्ट होत आहेत आणि नव्या अधिक कार्यक्षम पद्धती जन्म घेत आहेत. बदल स्वीकारतील, स्वतःची कौशल्ये अद्ययावत करतील आणि तंत्रज्ञानाच्या प्रवाहाविरुद्ध न जाता त्या प्रवाहाचा भाग बनतील, अशा लोकांचे भविष्य उज्ज्वल आहे. भारत केवळ या बदलाचा साक्षीदार नसेल, तर या जागतिक डिजिटल क्रांतीचे नेतृत्व करेल. आपल्याला केवळ पदवीधर व्हायचे नाही, तर 'कौशल्यवान' आणि 'डिजिटल साक्षर' व्हायचे आहे. ले-ऑफच्या या वावटळीत ज्ञानाचा आणि कल्पकतेचा पाया मजबूत असलेल्यांची नौका नक्कीच सुरक्षित किनाऱ्याला लागेल. शेवटी, हे लक्षात ठेवले पाहिजे की तंत्रज्ञान माणसाला पर्याय ठरू शकत नाही, तर ते माणसाला अधिक सक्षम करते. ले-ऑफची भीती बाळगण्यापेक्षा आपण आपल्या ज्ञानाची 'बॅटरी' सतत चार्ज ठेवली पाहिजे.

# तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या नूतन इमारती सह 'तुलसी क्रिएशन' शोरूमचे रविवारी उद्घाटन

## विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या वतीने विद्यार्थिनींच्या कौशल्याला हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या 'तुलसी क्रिएशन - द कम्प्लीट वुमन्स ड्रीम वर्ल्ड' शोरूम तसेच महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी १०:३० वाजता संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय.टी.आय. मागे, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे.

हा सोहळा पूज्यनीय भिक्खू संघाच्या मंगल मैत्रीत संपन्न होणार असून, पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, पूज्य भदंत करुणानंद महाथेरो आणि पूज्य भदंत धम्मशील थेरो यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सोहळ्याचे उद्घाटन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबईचे प्रधान सचिव मा.डॉ. हर्षदीप कांबळे आणि समाज कल्याण विभाग, पुणे यांच्या आयुक्त मा. दीपा मुधोळ-मुंडे यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रा. प्रदिप रोडे हे असणार आहेत.

याशिवाय, विविध क्षेत्रांतील प्रशासकीय अधिकारी, शिक्षण, उद्योग क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच अनेक प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती लाभणार आहे. विद्यार्थिनींना केवळ शिक्षण न देता त्यांना उद्योजक बनवणे या ध्येयाने हे शोरूम सुरू करण्यात आले आहे. फॅशन डिझाईनच्या विद्यार्थिनींनी तयार केलेले कलात्मक पेहराव आता थेट ग्राहकांसाठी उपलब्ध होणार आहेत. महाविद्यालयाची नवीन इमारत आधुनिक सोयी-सुविधांनी सज्ज असून, यामुळे जिल्ह्यातील फॅशन शिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे.

या प्रेरणादायी आणि ऐतिहासिक सोहळ्यास सर्व क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थिनींच्या या नव्या प्रवासाला बळ द्यावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांचेसह प्राध्यापक व कर्मचारीवृंद यांनी केले आहे.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त युगप्रवर्तक महोत्सवात व्याख्यान व कवी संमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांच्या वतीने युगप्रवर्तक महोत्सव-२६ चे आयोजन दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी या दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या रंगमंचावर युगप्रवर्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.महोत्सवाच्या पहिल्या दिवशी व्याख्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.प्रसिद्ध व्याख्याते श्रीकांत बरिंगे यांनीआधुनिक भारताचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्व स्तरावरील कार्याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलाताई देशमुख होत्या. त्यांनीही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिला, शेतकरी, कामगार व आधुनिक आधुनिक भारताच्या जडणघडणीत असलेले अनन्यसाधारण महत्त्व विशद केले.

दि.२७ एप्रिल रोजी विद्रोही कवींचे भव्य कवी संमेलन घेण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस उपनिरीक्षक आकाश माकने होते.यावेळी





आंबेडकरी चळवळीचे प्रसिद्ध गायक लोककवी वामनदादा कर्डक यांचे नातू संदेश शालिनी संभाजी कर्डक यांच्यासह बबन सरवदे, सुमित गुणवंत,सुदेश जगताप,गजानन गावंडे यांच्या विद्रोही कविता सादर करून उपस्थितांना प्रेरित केले. संदेश कर्डक यांच्या विद्रोही कवितांनी उपस्थित श्रोत्यांमध्ये एक नव चेतना निर्माण झाली. त्यांनी सादर केलेली कविता कोण आंबेडकर...?

माझी भूक,माझी तहान आंबेडकर या कवितेने लोकांना भारावून टाकले. सुमित गुणवंत यांच्या पहाडी आवाजात, शनिवार वाड्याची पायरी चढण्या अगोदर,फुले वाड्यांची पायरी चढली असती तर? या कवितेने सुद्धा प्रेक्षकांतुन जोरदार टाळ्या मिळविल्या. बबन सरवदे,सुरेश जगताप,गजानन गावंडे यांनीही इथोचित कविता व गझला सादर केल्या.

या कार्यक्रमांमध्ये शहरात डॉल्बीमुक्त जयंती साजरी करणाऱ्या फुलेनगर व सम्राट अशोक नगर येथील जयंती उत्सव कमिटी पदाधिकाऱ्यांचा आयोजकाच्या वतीने,लोककवी वामनदादा कर्डक यांचे नातू विद्रोही कवी संदेश शालिनी संभाजी कर्डक व उपस्थित कवींच्या हस्ते शिवाजी कोण होता ? हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. या दोन दिवसीय महोत्सवात शासकीय व निमशासकीय कर्मचारी,पत्रकार,विध्यार्थी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.या सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जागृती आणि सामाजिक समतेचा संदेश व्यापकपणे पोहोचवला.या दोन्ही कार्यक्रमाचे अनुक्रमे प्रास्ताविक बाळासाहेब सोनसळे सर व राहुल टाकणखार यांनी केले.तर सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव व प्रवीण काळे यांनी केले.आभार प्रा.संजय बागुल व भारत टाकणखार यांनी मानले.आगामी काळातही अशाच प्रकारच्या सामाजिक समता निर्माण करनाऱ्या वैचारिक कार्यक्रमाचे आयोजन सातत्याने होणार असल्याचे शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी सांगितले. व हा युगप्रवर्तक महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य केल.

# रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका

## आता जबाबदारी युनियनची; परिवहन मंत्री सरनाईकांच्या संघटनांना सूचना

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रात व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक रिक्षा आणि टॅक्सी चालकाला मराठी भाषेचे ज्ञान असणे आता अनिवार्य होणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत परप्रांतीय चालकांसाठीच्या 'मराठी मार्गदर्शन पुस्तिकेचे' प्रकाशन करण्यात आले. येत्या १ मे पासून ही पुस्तिका राज्यातील सर्व आरटीओ (ठढज) कार्यालयांमध्ये उपलब्ध करून दिली जाणार असून, १५ ऑगस्टपर्यंतची मुदत चालकांना देण्यात आली आहे.या निर्णयाबाबत माहिती देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, शशांक राव, संजय निरुपम, हाजी शराफत शेख अली यांच्यासह अनेक संघटनांनी आमच्याकडे वेळ मागितली होती. हिंदी भाषिक चालकांना मराठी शिकण्यासाठी अवधी हवा, अशी त्यांची भूमिका होती. आम्ही ती वेळ दिली आहे, पण आता या संघटनांची जबाबदारी वाढली आहे. त्यांनी आपल्या कार्यालयांत किंवा हॉल भाड्याने घेऊन चालकांना मराठी शिकवावे, असे आमचे स्पष्ट मत आहे.परिवहन विभागाने या मोहिमेसाठी एक विशेष वेळापत्रक आखले आहे. १ मे ते १५ ऑगस्ट या कालावधीत ही मोहीम राबवली जाईल. या काळात चालकांना मराठी भाषेचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी सवलत दिली जाईल. मराठी भाषेवरून १५ ऑगस्टपर्यंत



कोणताही दंड आकारला जाणार नाही. मात्र, तो चालक कायदेशीर कागदपत्रांनुसार रिक्षा चालवतोय की नाही, याची तपासणी आरटीओ अधिकारी करतील.१६ ऑगस्टनंतर आरटीओकडून होणाऱ्या तपासणीत भाषेच्या नियमांचे उल्लंघन आढळल्यास कठोर कारवाईचे संकेत परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले आहेत.प्रताप सरनाईक यांनी केवळ चालकांनाच नव्हे, तर मराठी प्रवाशांनाही एक महत्त्वाचे आवाहन केले आहे. ते म्हणाले, आपण जर मराठी भाषेवर मनापासून प्रेम करत असू, तर रिक्षा किंवा टॅक्सीमध्ये बसल्यानंतर समोरचा चालक कोणीही असो, त्याच्याशी मराठीतच बोला. जेव्हा महाराष्ट्रातील मराठी माणूस ही ठाम भूमिका घेईल, तेव्हाच आमच्या या मोहिमेला खरे यश मिळेल.प्रताप सरनाईक म्हणाले, या पुस्तिकेद्वारे आम्ही जुजबी ज्ञान देत आहोत. जर कुणी मनापासून शिकण्याचा प्रयत्न केला तर हिंदी भाषिक लोक मराठी शिकू शकतो. यात १५-१६ वाक्ये आहेत ती चालकाला माहिती असावेत. मराठी भाषा प्रेमळ आहे ४८ तासांमध्ये तुम्ही भाषा शिकू शकता. ही पुस्तिका मोबाईलवरही उपलब्ध करून देण्यात येईल. यात बारकोड देखील असेल, तो स्कॅन केल्यास ऑडिओ रुपातही माहिती मिळेल. महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल महाराष्ट्रात रहायच असेल मराठी भाषा येणे अनिवार्य आहे.आज झालेल्या कॅबिनेट बैठकीत परिवहन विभागाने घेतलेल्या या भूमिकेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी कौतुक करत पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. भाषेच्या मुद्द्यावरून होणारे वाद टाळून चालकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही पुस्तिका मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# ठाणे प्रिमियर लीगचा बिगुल १ मे रोजी वाजणार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या हस्ते होणार उद्घाटन

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

लेदर क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारी टीपीएल नावाने प्रसिद्ध असणारी क्रिकेट स्पर्धा ठाण्यात रंगणार आहे. महाराष्ट्र माझा सेवा संस्थेतर्फे युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने, मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या संलग्नतेने १ ते ८ मे दरम्यान ठाणे प्रिमियर लीग २०२६ आयोजन दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे करण्यात आले आहे. लीगचे यंदा १४ वे वरऱ्ष असून आयपीएल आणि रणजी करंडक स्पर्धेतून खेळलेले क्रिकेटपटू लीगमध्ये खेळणार असल्याने ठाणेकरांना रंगतदार लढती पहायला मिळणार असल्याचे मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पेक्स कौन्सिल मेंबर, महाराष्ट्र माझा सेवा संस्थेचे सल्लागार विकास रेपाळे यांनी सांगितले.राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ दिवस रंगणाऱ्या या लीगमध्ये ठाणे जिल्ह्यातील १६ संघांचा सहभाग असणार आहे. या संघामधून आयपीएल खेळलेले अथर्व अंकोलेकर, अखिल हेरवाडकर, साईराज पाटील, हार्दिक तामोरे, ध्रुमिल मटकर, दिव्यांश सक्सेना, रॉयस्टन डायस, प्रग्नेश कानपिल्लेवार, प्रवीण तांबे हे क्रिकेटपटू खेळणार आहेत. स्पर्धे दरम्यान एकूण चार लाख रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार असून सर्वोत्तम फलंदाज, क्षेत्ररक्षक, गोलंदाज आणि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूस गौरवचिन्ह आणि रोख बक्षिस देण्यात येणार आहे.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या प्रलंबित अडचणींना दिलासा

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक; सकारात्मक निर्णय

## बियाणे प्रमाणीकरण प्रणाली, थांबा यंत्र, परवाना प्रक्रिया व दंडात्मक कारवाईबाबत निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे खत, बियाणे आणि कीटकनाशके विक्री व्यवसायातील प्रलंबित अडचणी मार्गी लावण्यासाठी मंत्रालयात महत्त्वपूर्ण उच्चस्तरीय बैठक पार पडली. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या विविध समस्या, परवाना प्रक्रिया, बियाणे प्रमाणीकरण व मागोवा प्रणालीतील तांत्रिक अडचणी, थांबा यंत्र वापरातील अडथळे तसेच शेतकऱ्यांना दर्जेदार निविष्ठा वेळेत उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत सर्व बाबींवर सकारात्मक निर्णय घेत संबंधित विभागांना तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.बैठकीस विजय मांढरे कृषी आयुक्त पुणे, श्री बोरकर संचालक गुण नियंत्रण व निविष्ठा पुणे, प्रवीण देशमुख चीफ क्वालिटी कंट्रोल पुणे, रवी निगुडे किसान मोर्चा, बंडू गौरकार किसान मोर्चा, मनमोहन कलंत्री राष्ट्रीय अध्यक्ष, विनोद तराळ महाराष्ट्र अध्यक्ष माफदा, प्रशांत गुंडावार, पकज सारडा, प्रतीक हिरडे, अभिजित खटी कृषी विभागातील अधिकारी,इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.
आ.सुधीर मुनगंटीवार यांनी कृषी निविष्ठा विक्री व्यवसायातील प्रलंबित अडचणींबाबत ठाम भूमिका मांडत शेतकरी आणि विक्रेते या दोघांनाही दिलासा देणारे निर्णय घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली.





त्यांच्या उपस्थितीत कृषी निविष्ठा विक्री व्यवसायातील विद्यमान अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. परवाना देणे, नूतनीकरण प्रक्रिया व त्यातील अटी यासंदर्भात प्रतिनिधींनी विविध मुद्दे मांडले. निविष्ठांच्या वितरण व्यवस्थेत येणारे अडथळे, संबंधित कायदे व नियमांमधील त्रुटी तसेच त्यामधील आवश्यक सुधारणा यावर सखोल चर्चा झाली.
आ.सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार खत, बियाणे व कीटकनाशके वेळेत आणि सुलभरीत्या उपलब्ध होणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे ठामपणे नमूद केले. त्यांनी बियाणे प्रमाणीकरण, मागोवा व साठा व्यवस्थापन प्रणालीतील तांत्रिक अडचणी, थांबा यंत्र वापरातील अडथळे तसेच पीक पद्धतीतील बदलांचा निविष्ठा व्यवस्थापनावर होणारा परिणाम याकडे विशेष लक्ष वेधले. या सर्व समस्यांमुळे शेतकरी आणि विक्रेते दोघांनाही अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने विविध तांत्रिक समस्यांचे तातडीने निराकरण करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.
आ.सुधीर मुनगंटीवार यांनी कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या अडचणी सातत्याने मांडत शेतकऱ्यांपर्यंत योग्य दर्जाच्या निविष्ठा वेळेत पोहोचणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले. तांत्रिक त्रुटींमुळे विक्रेत्यांना अन्यायकारक दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू नये, तसेच परवाना प्रक्रियेत सुलभता आणणे गरजेचे असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी ठामपणे मांडले.
बैठकीत कृषी आयुक्तालयाने सर्व प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर अहवाल तात्काळ सादर करावा, परवाना प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी ठोस प्रस्ताव तयार करावा तसेच संबंधित कायदे व नियमांमध्ये आवश्यक सुधारणा सुचवून शासनास प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. निविष्ठा वितरण प्रक्रियेत पारदर्शकता व कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याचेही ठरविण्यात आले.
बैठकीत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी तांत्रिक त्रुटींमुळे कृषी निविष्ठा विक्रेते आणि शेतकऱ्यांना अन्याय सहन करावा लागू नये, तसेच प्रणाली अधिक सुलभ व पारदर्शक व्हावी, अशी ठाम मागणी केली. त्यांच्या मागणीनंतर बियाणे प्रमाणीकरण प्रणाली व थांबा यंत्र संदर्भातील तांत्रिक अडचणी १५ दिवसांच्या आत दूर करण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. संबंधित घटकांना प्रशिक्षण देऊन प्रणाली अधिक अद्ययावत व सुसंगत करण्याबाबतही कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. सद्यस्थितीत उद्भवलेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर सुधारणा पूर्ण होईपर्यंत निलंबन किंवा दंडात्मक कारवाई न करण्याबाबत तात्पुरती सूट देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय बैठकीत घेण्यात आला. तसेच उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर काही निर्णय १ मेपासून लागू करण्याबाबत सकारात्मक आश्वासन देण्यात आले. केंद्र सरकारच्या निर्णयांशी सुसंगत असे महाराष्ट्र शासनाचे निर्णयही घेण्यात यावेत,अशी बैठकीत आ.मुनगंटीवार यांनी मागणी मंत्री यावरही सहमती दर्शविण्यात आली.
कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सर्व बाबींवर सकारात्मक भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या अडचणी सोडवून शेतकरी व विक्रेते या दोघांनाही दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी पुढील बैठकीत प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.बैठकीत कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या विविध प्रलंबित अडचणींवर सकारात्मक निर्णय झाल्यानंतर माफदा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल आभार व्यक्त केले. कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या समस्या शासन स्तरावर प्रभावीपणे मांडून त्यावर मार्ग काढण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल पदाधिकाऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या पुढाकारामुळे विक्रेते आणि शेतकरी या दोघांनाही मोठा दिलासा मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# महाशिवलिंग विकासासाठी वेकोलि सीएमडींची पाहणी

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शहरालगत असलेल्या महाशिवलिंग परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आता गती मिळताना दिसत आहे. त्यांच्या पुढाकारातून वेकोलीचे सिएमडी हेमंत पांडे यांनी आमदार किशोर जोरगेवार व विविध संबधित अधिका-यांसह महाशिवलिंग क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करत प्रस्तावित विकासकामांचा आढावा घेतला.
यावेळी वेकोलीचे महाप्रबंधक संजिव रेड्डी, मनपा उपअभियंता आशिष भारती, सार्वजनिक बांधकाम विभागचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता साबळे, भारतीय जनता पार्टीचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री सविता दंढारे, रविंद्र गुरुनुले, बलराम डोडाणी, मनपा गटनेते शेखर शेट्टी, अजय जयसवाल, तुषार सोम, श्याम ढोपटे, प्रिंन्स प्रसाद आदिंची उपस्थिती





होती.या पाहणीदरम्यान आमदार जोरगेवार यांनी महाशिवलिंग क्षेत्राच्या एतिहासिक धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या असलेल्या महत्त्वावर विशेष भर देत, येथे येणार्या हजारो भाविकांसाठी मूलभूत सुविधा निर्माण करणे अत्यावश्यक असल्याचे म्हटले. वाढत्या भाविकसंख्येमुळे पाणी, स्वच्छता, रस्ते, प्रकाशव्यवस्था आणि सुरक्षेच्या सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची गरज त्यांनी यावेळी बोलुन दाखविली.
आमदार जोरगेवार यांनी वेकोलि प्रशासनासमोर सविस्तर विकास आराखडा मांडत पिण्याच्या स्वच्छ पाण्यासाठी आरओ प्लांट, जलपुरवठा सुधारणा, मंदिर परिसराचे सुशोभीकरण, सुरक्षा भिंत, सोलर हायमास्ट लाईट, प्रशासकीय कार्यालय, तसेच भक्तांसाठी निवास व्यवस्था याबाबत सविस्तर चर्चा केली. यासोबतच महाशिवलिंगपर्यंत जाणार्या मार्गाचे मजबुतीकरण, स्वागतद्वारांची उभारणी, दिशादर्शक फलक, स्वच्छतागृहे आणि परिसरातील स्वच्छता मोहीम यांसारख्या सुविधांवरही त्यांनी विशेष भर दिला.पाहणीदरम्यान वेकोलि अधिकार्यांनीही या प्रस्तावांचा सकारात्मक विचार करण्याचे संकेत दिले असून आवश्यक तांत्रिक व आर्थिक बाबींचा आढावा घेऊन लवकरच निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. आमदार जोरगेवार यांनी या कामांसाठी वेकोलिकडून आवश्यक निधी व तांत्रिक सहकार्य मिळावे, यासाठी पुढील स्तरावरही पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. महाशिवलिंग क्षेत्राचा विकास झाल्यास चंद्रपूरच्या पर्यटन नकाशावर या स्थळाला नवे स्थान मिळेल, तसेच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास आमदार जोरगेवार यांनी व्यक्त केला. त्यांच्या पुढाकारामुळे महाशिवलिंग परिसराचा कायापालट होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

# गांधी चौकातील जि.प.जागेवरील अतिक्रमण हटवले; प्रशासनाची कारवाई भाजप पदाधिकाऱ्यांचा पुढाकार

दैनिक वादळ वार्ता
**मूल । प्रतिनिधी**

शहरातील गांधी चौक येथे जिल्हा परिषद मालकीच्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेवर अवैध बांधकाम करण्याचा प्रयत्न उघडकीस आला असून, प्रशासनाने तातडीने कारवाई करत संबंधित अतिक्रमण हटवले आहे. या प्रकरणात स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपामुळे प्रकार वेळीच थांबवण्यात आला.मिळालेल्या माहितीनुसार, काँग्रेसशी संबंधित संतोष रावत यांनी सदर जागेवर बेकायदेशीर बांधकाम सुरू केल्याचा आरोप आहे. ही बाब लक्षात येताच भाजपाचे शहराध्यक्ष प्रविण मोहुर्ले व नगरसेविका प्राची आक्केवार यांनी तत्काळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली.तक्रारीची दखल घेत जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधितांना नोटीस बजावून काम तात्काळ थांबविण्याचे आदेश दिले होते. मात्र आदेशाचे पालन न झाल्याने प्रशासनाने कठोर भूमिका घेत प्रचंड पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या



सहाय्याने अतिक्रमण हटवले.
या कारवाईमुळे सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्यात यश आले असून, राजकीय प्रभावाच्या जोरावर बेकायदेशीर बांधकाम करण्याचा प्रयत्न निष्फळ ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.
दरम्यान, या प्रकरणात पुढाकार घेत प्रशासनाचे लक्ष वेधल्याबद्दल प्रविण मोहुर्ले व प्राची आक्केवार यांच्या कार्याचे विविध स्तरांतून कौतुक केले जात आहे.

# क्रीडा विभागाच्या वतीने विविध खेळांचे प्रशिक्षण शिबीर

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद, चंद्रपुरच्या वतीने जिल्ह्यातील उदोन्मुख खेळाडूंना अद्यावत व तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्याकरिता उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन पहिल्या टप्प्यात २ ते ११ मे पर्यंत तर दुसरा टप्पा १२ ते २१ मे २०२६ पर्यंत आयोजित करण्यात आला आहे.
जिल्हा स्टेडीयम, चंद्रपूर येथे सकाळी व सायंकाळी शिबिराचे आयोजन करण्यात येणार यात व्हॉलीबॉल व बॉक्सिंग, जलतरण, कराटे, बास्केटबॉल, बॅडमिंटन, वुशु या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण, सोबतच खेळाडुंना कौशल्य विकासाचे धडे, समुपदेशन, चर्चासत्र, परिसंवाद तज्ञ क्रीडा मार्गदर्शकांकडून



देण्यात येईल. सदर प्रशिक्षण शिबिरात १२ वर्षावरील ते १९ वर्षाखालील सर्व मुलामुलींना सहभाग घेता येईल.शिबिरात भाग घेण्याकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यात नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. चंद्रपुर जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांनी केले आहे.

# जेऊर येथे जखमी जपानी कॉर्मोरंट’पक्षाला जीवनदान; स्थानिकांच्या तत्परतेने उपचार

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

२९ एप्रिल रोज बुधवारला जेऊर परिसरात दुपारी सुमारे १.३८ वाजता तब्बल ४१ अंश सेल्सिअस तापमानात एक दुर्मीळ जपानी कॉर्मोरंट पक्षी जखमी अवस्थेत आढळून आला. संबंधित पक्षी पंख पसरवत उडण्याचा प्रयत्न करत होता, मात्र त्याला उडता येत नसल्याचे दिसून आले. जवळून पाहणी केली असता त्याचा डावा पाय गंभीररित्या मोडलेला असल्याचे स्पष्ट झाले.
घटनेची माहिती मिळताच काँग्रेसचे तालुकाध्यक्ष साहेबराव वाघमारे, तसेच सचिन कांबळे व महेश चांदणे यांनी तत्काळ मदतकार्य हाती घेतले. त्यांनी जखमी पक्षाला पाणी पाजून प्राथमिक मदत केली आणि तातडीने जेऊर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले.दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. आर. एन. होळकर यांनी पक्षाची तपासणी केली असता त्याचा एक पाय सुमारे ९० टक्के मोडलेला असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी तत्परतेने उपचार करत जखमी पायाला प्लास्टर केले व आवश्यक वैद्यकीय उपचार दिले.यानंतर संबंधित पक्षाला पुढील देखभाल व पुनर्वसनासाठी मोहोळ येथील वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी काँग्रेस युवक तालुकाध्यक्ष साहेबराव वाघमारे, रिक्षा चालक सचिन कांबळे, गट शिक्षणाधिकारी चंद्रकांत साळवे, शिवाजी आबा आवटे उपस्थित होते. वनविभागाच्या आयेशा शेख व त्यांच्या कर्मचाऱ्यांकडे पक्षी सुरक्षितपणे देण्यात आला.जखमी जपानी कॉर्मोरंट पक्षाची योग्य काळजी घेऊन त्याला पुन्हा निसर्गाच्या सान्निध्यात मुक्त करण्यात यावे, अशी मागणी उपस्थितांनी केली आहे.या घटनेत स्थानिकांनी दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता निसर्ग व वन्यजीव संरक्षणासाठी प्रेरणादायी ठरत आहे.



# डॉ.अमोल शिंगनाथ यांना ‘महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६’

## उद्योग,रोजगार व समाजसेवेतील कार्याचा गौरव

दैनिक वादळ वार्ता
**पाटस । योगेश राऊत**

उरुळी कांचन येथील सुपुत्र तथा शिवस्वराज्य उद्योग समूहाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. अमोल विश्वनाथ शिंगनाथ यांना राज्यस्तरीय ‘महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६’ देऊन गौरविण्यात आले. सिक्युरिटी सेवा, हॉटेल व्यवसाय, शिक्षण क्षेत्र आणि समाजसेवेत केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.गेल्या पाच वर्षांपासून ‘शिवस्वराज्य सिक्युरिटी अँड मॅनपावर सर्व्हिसेस प्रा. लि.’ या भारत सरकारमान्य कंपनीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना भरती करून त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण व रोजगार उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. शिंगनाथ आणि त्यांची टीम करत आहे. दौंड तालुक्यातील बोरिभडक येथे या कंपनीचे प्रशिक्षण केंद्र असून पुण्यात शाखा कार्यालय कार्यरत आहे.सिक्युरिटी क्षेत्रात तब्बल २६ वर्षांचा अनुभव असलेल्या डॉ. शिंगनाथ यांनी ६ मार्च २०२१ रोजी शिवस्वराज्य उद्योग समूहाची स्थापना केली. अनुभवी सहकाऱ्यांसह त्यांनी रोजगारनिर्मिती व कौशल्य विकासावर भर देत अनेक तरुणांना स्वावलंबी बनवले आहे.उद्योग क्षेत्राबरोबरच ‘हॉटेल झकास भोजनालय’ या माध्यमातून उरुळी कांचन येथे शुद्ध शाकाहारी व परवडणाऱ्या दरात दर्जेदार भोजन देण्याची सेवा देखील सुरू आहे. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे योगदान लक्षणीय असून, अभ्यासू व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची पुणे जिल्ह्यात ओळख निर्माण झाली आहे.
समाजसेवेच्या माध्यमातून गरजूंची मदत, बोरिभडक गावात स्वच्छता अभियान, तसेच परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात ते सदैव पुढाकार घेतात. देश सेवा हीच ईश्वर सेवा हे त्यांचे ब्रीदवाक्य असून, तरुणांनी शिक्षणाबरोबर मूल्यशिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे, असा संदेश ते सातत्याने देत असतात.या यशामध्ये शिवस्वराज्य उद्योग समूहातील संचालक सौ. अश्विनी अमोल शिंगनाथ, गोरख जगताप, तसेच मॅनगार्डिंग विभागाचे संचालक कर्नल नायर आणि संपूर्ण टीमचे विशेष योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. हॉटेल झकास भोजनालयच्या टीमचेही त्यांनी आभार मानले.महाराष्ट्र दिन (१ मे) निमित्त प्रदान करण्यात आलेल्या या पुरस्काराबद्दल विजेता मीडिया पुणे, राष्ट्रभक्ती संघटना महाराष्ट्र राज्य, शौर्य अकॅडमी पुणे, पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य तसेच शिवस्वराज्य उद्योग समूह परिवाराचे त्यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# उष्मघातापासून बचाव करण्याच्या सूचना

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

उष्माघाताची कारणे-उन्हामध्ये शारिरीक श्रमामुळे,उन्हात मजुरीचे कामे फार वेळ करणे,कारखान्यांचे बॉयलर रुममध्ये व काच कारखान्यात काम करणे,जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे.घट्ट कपड्यांचा वापर करणे.उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबंध येणे ही उष्माघात होण्याची कारणे आहेत.लग्न उत्सव, यात्रा याठिकाणी अति उन्हात थांबणे व फिरणे,

**उष्माघाताचे लक्षणे**


चक्कर येणे, उलटी व मळमळ होणे,शरीराचे तापमान खूप वाढणे,पोटात कळा येणे,शरीरातील पाणी कमी होणे,त्वचा कोरडी होणे,डोके दुखणे.बेशुद्ध होणे अथवा अस्वस्थ होणे,

**जोखीम गट**

५ पेक्षा कमी वयाची बालके ६५ पेक्षा जास्त वय असणारे जेष्ठ नागरिक,अधिक कष्टाची सवय नसणारी व्यक्ती. धूम्रपान, मद्यपान करणारी व्यक्ती,मुत्रपिंड,-हदयरोग, यकृत,त्वचा विकार,लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण. अति आद्रता, वातानुकुलनाचा अभाव, शेतकाम, कारखान्यातील काम करणारे कामगार, उष्णतेशी संबधित व्यवसाय करणारे व्यक्ती.

**उष्णतेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी काय करावे**

पुरेसे पाणी प्या, तहान लागलेली नसली तरी दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या. जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे.
घराबाहेर पडतांना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा.
दुपारी १२ ते ३ वाजेच्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळा.
सूर्य प्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा.
उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडीओ, टीव्ही किंवा वर्तमान पत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा,
हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.
बाहेर जातांना गॉगल्स, छत्री, टोपी, बूट व चपलांचा वापर करण्यात यावा.
प्रवास करतांना पिण्याच्या पाण्याची बाटली सोबत घ्यावी.
उन्हात काम करत असलेल्या कामगारांनी / व्यक्तींनी डोक्यावर टोपी किवा पांढरा रुमाल बांधावा किवा छत्रीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा,शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्या ओ.आर.एस. घ्यावे, घरी तयार करण्यात आलेली लस्सी / ताक / कैरीचे पन्हे / लिंबू पाणी इत्यादीचा नियमित वापर करावा.
अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना / पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे.
घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात.
पंखे, ओले कपडे यांचा वापर करण्यात यावा तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे.
कामाच्या ठिकाणी कामगारांसाठी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.
सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे.
पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा.
बाहेर उन्हात काम करीत असतांना थोड्या थोड्या अंतराने विश्रांती घ्यावी,
गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी.
रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावेत.
जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी.
काँक्रीट घराचे छतावर पांढरा रंग द्यावा.
टीन पत्र्याचे छतावर गवताची पेंढी / धान्याचा कडवा यांचे आच्छादन करावे,
छतावरील पाणी साठवण्याच्या प्लास्टिक टाक्या गोणपाटाच्या सहाय्याने झाकाव्यात.अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणचे अध्यक्ष बीड यांनी दिल्या आहे.



## लोहा -कंधार मधील सर्व गावातील शेतकऱ्यांना सरसकटपणे पिकविमा मिळाला पाहिजे यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार-शिवराज दादा धोंडगे

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

लोहा -कंधार तालुक्यातील शेतकऱ्यांना २०२५ चा खरिपाचा पिकविमा मिळाला पाहिजे यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याची माहिती शिवसेनेचे लोहा -कंधार चे युवानेते शिवराज दादा धोंडगे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.

लोहा -कंधारसह राज्यात २०२५ मध्ये जुन ते सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. शासनाने ओला दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी ,पिकविमा मंजूर करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली होती. यांची दखल शासनाने घेऊन शेतकऱ्यांच्या खात्यावर अतिवृष्टीचे अनुदान जमा झाले तसेच पिकविमा कंपनीने ही पिकविमा ही मंजुर केला आहे पण लोहा -कंधार तालुक्यातील अनेक गावांतील शेतकरी सांगत आहेत आमचे गाव पिकविम्यात आले नाही. तेव्हा या शेतकऱ्यांनी काहीही काळजी करू नये. लोहा तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकटपणे पिकविमा मिळाला पाहिजे यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करुन सर्व शेतकऱ्यांना सरसकटपणे पिकविमा मिळाला पाहिजे यासाठी पाठपुरावा करणार असल्याची माहिती शिवसेनेचे लोहा -कंधारचे युवा नेते शिवराज दादा धोंडगे यांनी सांगितले.



## टाकळी येथे मानव उद्धार बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून भीम जयंती निमित्त मोफत पाणी वाटप

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदनगर टाकळी येथे दि.२७ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त विविधसामाजिक व उपयुक्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमांमुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.मानव उद्धार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,टाकळी ही संस्था नेहमीच समाजकार्यात अग्रेसर राहून विविध उपक्रम राबवत असते. भीमजयंतीच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने गावातील नागरिकांना मोफत पाणी वाटप करण्यात आले.या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष अतुल सोनवणे, उपाध्यक्ष पंडित बारगजे यांच्यासह गावातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच अरुण मस्के,बालाजी कांदे,जीवन सिरसट, किशोर सिरसट,महादेव सिरसट,सिद्धांत मस्के, समाधान सिरसट,पप्पू सिरसट आदींची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाद्वारे सामाजिक एकोप्याचा संदेश देण्यात आला असून,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा प्रयत्न करण्यात आला.




## डॉ.किरणकुमार वैरागे यांची सुपर स्पेशालिटी प्लास्टिक सर्जरी अभ्यासक्रमासाठी निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील आनंदगाव येथील भूमिपुत्र डॉ.किरणकुमार रघुनाथ वैरागे (MBBS, MS) यांची सुपर स्पेशालिटी प्लास्टिक सर्जरी (M.ch in plastic Surgery )या अभ्यासक्रमासाठी बी.जे. गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज पुणे येथे निवड झाली.एमबीबीएस, एमएस (जनरल सर्जरी) चेवैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सुपर स्पेशालिटी (प्लास्टिक सर्जरी) साठी त्यांची निवड झाली.अभ्यासू वृत्ती असलेले डॉ. किरणकुमार वैरागे हे सुपर स्पेशालिटी प्लास्टिक सर्जरीचे शिक्षण घेऊन रुग्णांची सेवा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.या यशाबद्दल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशीवचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चव्हाण तसेच डॉ.खैराटकर,डॉ.अजित डीकले,डॉ.प्रवीण गोवांदे, डॉ.हनुमंत सौदागर यांनी अभिनंदन केले आहे.



## कांद्याने केला शेतकऱ्यांचा वांधा: कवडीमोल दरामुळे बळीराजा संकटात!

दैनिक वादळ वार्ता

कांदा नाकीनऊ आणतो असे म्हटले जाते, मात्र सध्या कांद्याच्या कोसळलेल्या दराने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत खऱ्या अर्थाने पाणी आणले आहे. मोठ्या आशेने आणि कष्टाने पिकवलेल्या कांद्याला बाजारात अपेक्षित भाव मिळत नसल्याने, उत्पादन खर्च निघणेही कठीण झाले आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक संकटाच्या चक्रात अडकला आहे.

**खर्च जास्त, उत्पन्न कमी**

चालू हंगामात हवामानातील बदल आणि रोगांचा प्रादुर्भाव सोसून शेतकऱ्यांनी कांदा पीक वाचवले. खते, औषध फवारणी, काढणी आणि वाहतूक यासाठी मोठा खर्च झाला आहे. मात्र, बाजार समित्यांमध्ये कांद्याला मिळणारा दर हा उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. अनेक ठिकाणी कांदा ५ ते १० रुपये किलो दराने विकला जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**शेतकऱ्यांची व्यथा**

रात्रंदिवस शेतात राबून कांदा पिकवला, पण आता बाजारात नेल्यावर गाडीभाडं निघेल की नाही याची भीती वाटतेय,अशी हतबलता एका स्थानिक शेतकऱ्याने व्यक्त केली. अनेक शेतकऱ्यांनी खर्च निघत नसल्याने कांदा शेतातच सोडून दिला आहे किंवा साठवणुकीचा मार्ग निवडला आहे. परंतु, साठवणुकीसाठी पुरेशा सोयी नसल्याने कांदा सडण्याची भीतीही वाढली आहे.

**प्रमुख मागण्या**

* सरकारने तातडीने कांद्याला हमीभाव द्यावा.
* कांदा निर्यातीबाबत ठोस आणि सातत्यपूर्ण धोरण राबवावे.
* नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने थेट आर्थिक मदत जाहीर करावी.

आता सर्व लक्ष सरकारकडे लागले असून, बळीराजाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासन काय पावले उचलणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची आज खरी गरज आहे-डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

### पुस्तकाने वाचनाने मस्तक संपन्न होते-आनंद भैय्या गायकवाड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती व श्री नृसिंह जयंती ग्रंथवाचन, व्याख्यान,परिसंवाद कार्यक्रम घेवून संपन्न झाली.दिनांक २३ एपिल २०२६ रोजी जागतिक पुस्तक दिन पुस्तकवाचन व चर्चासत्र कार्यक्रम घेवून संपन्न झाला.दि. ३० एप्रिल २०२६ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती व श्री नृसिंह जयंती साजरी करण्यात आली.ग्रंथ वाचन रविंद्र गायकवाड (पेन्टर ) यांनी केले. व्याख्यान बाळासाहेब गायकवाड,आनंद भैय्या गायकवाड यांनी केले. परिसंवादात प्रकाश गायकवाड,विकास गायकवाड यांनी सहभाग घेवून मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते व परखड व्याख्याते डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचाराची खरी गरज समाजाला असल्याचे प्रतिपादन प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय पुस्तक दिन पुस्तक वाचन व चर्चासत्र,ग्रंथ प्रदर्शन घेवून संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डाँ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.

यावेळी पुस्तक वाचन, चर्चासत्र व ग्रंथप्रदर्शन घेवून आंतरराष्ट्रीय पुस्तक दिन साजरा करण्यात आला.

पुस्तक वाचन कु.अक्षरा सौदागर,सुशांत सौदागर, प्रतिक गायकवाड,स्वरूप पानढवळे,आर्यन गायकवाड यांनी केले. तर चर्चा सत्रात संजय सोनवणे,रामराजे गायकवाड,अक्षरा सौदागर,आनंद भैय्या गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.पुस्तक वाचनाने मस्तक संपन्न होते,संपन्न मस्तक कोणापुढे नतमस्तक होत नाही व कोणाचे हस्तक ही होत नाही असे प्रतिपादन आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

ग्रंथ प्रदर्शनालाही खुप चांगला प्रतिसाद मिळाला.



## संकट हारणारी कुलदैवत वेलमातेची आज यात्रा


### आदिवासी संस्कृती अन् परंपरेची वेल वाढतीच ठेवणाऱ्या देवतेची सातपुड्याच्या साक्षीने होणार आराधना

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

देशाच्या मध्यवर्ती भागात पसरलेल्या सातपुडा पर्वताच्या कुशीत काही प्रस्तावित समाज वगळता आदिवासीच अधिक वसले आहे. खरं तर हा अन्न, पाणी, हवा, सूर्य (प्रकाश), झाड (जंगल) अशा प्राकृतिक घटकांचीच पूजा करणारा समाज म्हणून ओळखला जातो. अशाच प्राकृतिक घटकांपैकीच एक असलेल्या अन् वेली ता.अक्कलकुवा येथे वसलेली कुलदैवत 'वेलमाता' या मातेची १ मे रोजी अवघ्या सातपुडावासीयांच्या साक्षीने व ग्रामस्थांच्या सामुहिक योगदानाने आराधना केली जाणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून आदिवासी दैवी परंपरा, संस्कृती जपली जाणार आहे. शिवाय देवतांच्या इतिहासावरही जनजागर होणार आहे.

वेली गावातील 'वेलमाता' या कुलदेवतेला दाब राजमंडलांतर्गत मोठा इतिहास आहे. या देवीची आराधना ही केवळ धार्मिक श्रद्धाच नव्हे ती सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक परंपरेचा भाग आहे. या देवतेने गावाचे संरक्षण करावे म्हणून १९९२ पासून वेली ता.अक्कलकुवा येथे लोकमान्यतेनुसार दरवर्षी यात्रा भरवली जाते. माता समाजाचे संकट, रोगराई, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती व अन्य वाईट शक्तींपासून संरक्षण करते. सुख-समृद्धी, शांतता, भरघोस पीक, आवश्यकतेनुसार पाऊस, जनावरांचे आरोग्य देखील कायम राखत असल्याची श्रद्धा अवघ्या सातपुड्यात आहे. त्यानुसार यंदा असंख्य भाविक नवस फेडण्यासाठी व आराधनेसाठी यात्रेत सहभागी होणार आहे.

या यात्रेसाठी प्रत्येक वेलीवर काही दिवसांपासून योगदान देत असून ते यात्रा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी माजी पंचायत समिती सदस्य वाण्या वळवी यांच्या नेतृत्वात अखेरपर्यंत निष्ठेने आपापली जबाबदारी पार पाडणार आहे. त्यामुळे हे यात्रा पर्व वेलीकरांमधील एकतेला बळ देणारे ठरते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077